

महापालिकेची प्रारूप मतदार यादी 14 नोव्हेंबरला होणार प्रसिद्ध

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 07/11/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 5 || अंक 259 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# टाईमपास म्हणून निवडणूका लढावायच्या नाही - राज ठाकरे

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक राजकीय पक्षांनी बैठका, मेळावे घेण्यास सुरुवात केली आहे.**



त्या सर्व घडामोडींचा आढावा घेण्यासाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे पुणे दौऱ्यावर आले होते. त्यावेळी शाखा अध्यक्षांसह अन्य पदाधिकाऱ्यांसोबत राज ठाकरे यांची बैठक घेतली. त्या बैठकीत राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना सुनावल्याचे पाहण्यास मिळाले.“नगरपालिका आणि नगर परिषदांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. त्यानंतर जिल्हा परिषद, महापालिका निवडणुका होणार आहेत, त्या दृष्टीने प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून काम करायला सुरुवात करा, प्रत्येक मतदारांपर्यंत मनसे सैनिकांनी पोहोचा, प्रत्येक मतदार यादीवर काम करा. टाईमपास म्हणून निवडणुका लढावायच्या नाहीत, काम दाखवा; मी इकडे टाईमपास करण्यासाठी आलो नाही. तयारी नसेल तर दुसऱ्या पक्षात जा, उमेदवाराची आर्थिक परिस्थिती असो किंवा नसो त्याचं काय करायच ते मी बघतो, तसेच आज रात्रीपर्यंत तुमच्या प्रभागातील बूथ प्रतिनिधींची यादी द्या,” अशा शब्दांत राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना बैठकीत सुनावले.

# पार्थ पवारांच्या जमीन खरेदी प्रकरणावर अजित पवारांची प्रतिक्रिया

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे - उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने पुण्याच्या कोरेगाव पार्क येथील ४० एकरांचा भूखंड विकत घेतल्यानंतर राजकीय आरोपांची राळ उठली.**



विरोधकांनी आरोप केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली.

त्यानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वतः भाष्य केले आहे. माध्यमांशी बोलत असताना त्यांनी मुलगा पार्थ पवारच्या खरेदी प्रकरणावर सविस्तर भूमिका मांडली.“माध्यमांनी जे काही प्रकरण चालवले आहे. त्याची पूर्ण माहिती आता माझ्याकडे नाही. माझा त्या गोष्टीशी थेट किंवा दुरान्वयेदेखील संबंध नाही. ३५ वर्षांपासून महाराष्ट्रातील जनता मला ओळखते.

मी या प्रकरणाची संपूर्ण माहिती घेण्याचे ठरवले आहे.दोन-चार महिन्यांपूर्वी असे काहीतरी चालू असल्याचे माझ्या कानावर आले होते. कोणत्याही चुकीच्या गोष्टी करू नयेत, अशा सूचना मी दिल्या होत्या.

पण मधल्या काळात काय झाले? मला माहीत नाही”, असे अजित पवार म्हणाले.अजित पवार पुढे म्हणाले, “मी आजपर्यंत कधीही माझ्या जवळच्या किंवा दूरच्या नातेवाईकाला लाभ होईल, असे निर्देश अधिकाऱ्यांना दिलेले नाहीत. मी कधीही अधिकाऱ्यांना फोन करून काही आदेश दिलेले नाहीत.उलट यानिमित्ताने उपमुख्यमंत्री म्हणून मी सर्वच अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सांगेन की, जर माझ्या नावाचा वापर करून कुणी चुकीचे करत असेल किंवा नियमात न बसणारे काम करत असेल तर त्याला माझा पाठिंबा नसेल.

मी कायद्याच्या आणि नियमाच्या चौकटीत राहून काम करणारा माणूस आहे.”

# पिंपरी चिंचवड मध्ये 'कलाकार कट्टा'

## भाऊसाहेब भोईर यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या कलाकार कट्टा ला कलाकारांचा प्रचंड प्रतिसाद

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**चिंचवड - पिंपरी चिंचवड शहरात अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखेच्या वतीने मराठी रंगभूमी दिनानिमित्त भाऊसाहेब भोईर यांच्या संकल्पनेतून 'कलाकार कट्टा' या उपक्रमाचे शुभारंभ करण्यात आले. शहरातील कलाकारांसाठी आपली कला सादर करण्याकरिता एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आला आहे.**



अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोई यांच्यावतीने पं. पद्माकर कुलकर्णी कला मंदिर, तळमजला, प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह चिंचवड येथे नवकलाकारांकरिता , आपल्यातली कला आत्मसात करून ती या व्यासपीठावर सादर करण्याकरिता हा कलाकार कट्टा उपलब्ध आहे. या व्यासपीठाचे उद्घाटन दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी भाऊसाहेब भोईर, साहित्य परिषदेचे अध्यक्ष राजन लाखे, मा. जोशी सर, मा ढवळे सर यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटन कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली. यामध्ये कलाकार, साहित्यिक ,पत्रकार, नाट्य, संगीत, लोककलावंत तसेच नृत्य कलावंत, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी अनेक कलाकारांनी आपली कला सादर केली. यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना भाऊसाहेब भोईर म्हणाले, "रंगभूमी दिनाचे औचित्य साधत शहरातील कलाकारांना एक हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी या कलाकार कट्टा उपक्रमाचे शुभारंभ करण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड शहर मध्ये विकासासोबतच कला आणि संस्कृती वृद्धिंगत व्हावी, यासाठी हे यशस्वी पाऊल असल्याचे भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले. तसेच या उपक्रमात सहभागी होऊन, आपल्यातली कला आत्मसात करून या व्यासपीठावर सादर करण्याचे आवाहन देखील भाऊसाहेब भोईर यांनी केले.यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपापली कला सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली. तसेच दर महिन्याला या कलाकार कट्टा या उपक्रमात सहभागी होणार असल्याचे उपस्थित मान्यवरांनी आश्वासन दिले. सोबतच आपापली कला जोपासण्याकरिता व्यासपीठामार्फत सादर करणार असल्याचे देखील अनेक कलाकारांनी सांगितले तसेच हा व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल उपस्थितांनी भाऊसाहेब भोईर यांचे आभार व्यक्त केले.

# 'आप'च्या 'दिल्ली मॉडेल'वर आधारित धोरणात्मक संवाद बैठक यशस्वी

## आगामी निवडणुकीसाठी पक्षाची रणनीती निश्चित

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : आम आदमी पार्टी, पिंपरी-चिंचवड शहर यांच्या वतीने आगामी महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेला "इच्छुक उमेदवार तथा कार्यकर्ता संवाद बैठक" यशस्वीरित्या संपन्न झाला.**



या बैठकीमुळे पक्षाच्या निवडणुकीच्या तयारीला महत्त्वपूर्ण गती मिळाली असून, शहर विकासाचा संकल्प सिद्धीस नेण्याची घोषणा पक्षाकडून करण्यात आली आहे.या कार्यक्रमासाठी आम आदमी पार्टी, महाराष्ट्र राज्याचे समन्वयक, अमित म्हस्के यांचे प्रमुख धोरणात्मक मार्गदर्शन लाभले, तर शहराध्यक्ष रविराज काळे यांनी कार्यक्रमाचे नेतृत्व केले.अमित म्हस्के यांनी उपस्थित सर्व इच्छुक उमेदवार आणि निष्ठावान कार्यकर्त्यांना धोरणात्मक मार्गदर्शन केले. त्यांनी दिल्लीतील 'आप' सरकारने शिक्षण, आरोग्य, आणि मूलभूत सेवांवर यशस्वीरित्या अंमलात आणलेल्या 'दिल्ली मॉडेल'च्या पारदर्शक आणि कल्याणकारी कारभाराचे महत्त्व स्पष्ट केले.पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासासाठी हे मॉडेल कसे उपयुक्त ठरू शकते, तसेच भ्रष्टाचाराला प्रतिबंध घालून शहराच्या विकासाची ध्येयधोरणे कशी निश्चित करावी, यावर त्यांनी भर दिला.शहराध्यक्ष रविराज काळे यांनी बैठकीच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले. त्यांनी स्पष्ट केले की, या बैठकीद्वारे पक्षाच्या निवडणुकीच्या रणनीतीला सुरुवात झाली आहे. पिंपरी-चिंचवडकरांचे प्रश्न सोडवण्यासाठी, तसेच त्यांना भ्रष्टाचारमुक्त आणि पारदर्शक प्रशासन देण्यासाठी सामूहिक प्रयत्नांनी मैदानात उतरण्याचे आवाहन त्यांनी केले.

या बैठकीस लाभलेल्या प्रतिसादानंतर 'आप'ने स्पष्ट केले आहे की, पक्ष पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी पूर्णपणे सज्ज असून, शहराला पर्यायी आणि सक्षम नेतृत्व देण्यासाठी ठोस पाऊले उचलली जातील, यावेळी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 07/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# रिक्षाला कट मारल्याचा जाब विचारल्याने कोयत्याने मारहाण

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : रिक्षाला धक्का (कट) मारल्याचा जाब विचारल्याच्या कारणावरून तरुणाच्या डोक्यात आणि हातावर कोयत्याने वार केले. 'मी येथील भाई आहे, माझ्यावर दोन हाफमर्डरच्या केस चालू आहेत' असे बोलून दहशत निर्माण केली. ही घटना अजंठानगर, चिंचवड येथे घडली.या प्रकरणी विशाल सुरेश शिंदे (२५, मोरेवस्ती, चिखली) यांनी निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आकाश विश्वंबर गायकवाड (३१, अजंठानगर, चिंचवड) आणि दिगंबर विश्वंबर गायकवाड (३५, अजंठानगर, चिंचवड) या दोघांना अटक करण्यात आली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी रस्त्यावर त्यांच्या मित्रासोबत गप्पा मारत असताना आरोपी आकाश याने रिक्षाने फिर्यादीला कट मारला. फिर्यादीने याचा जाब विचारला असता, त्याचा राग येऊन आरोपीने फिर्यादीच्या डोक्यात व हातावर कोयत्याने वार केले. दिगंबर याने हातातील कोयता हवेत फिरवून 'मी येथील भाई आहे, माझ्यावर दोन हाफमर्डरच्या केस चालू आहेत.

माझ्या मध्ये कोणीही आले तर मी त्यास सोडणार नाही' असे बोलून परिसरात दहशत निर्माण केली. निगडी पोलीस तपास करत आहेत.

# 'ॲमेनिटी स्पेस' मिळवून देतो म्हणत 24 लाखांची फसवणूक

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे : सार्वजानिक सेवा सुविधांसाठी राखीव भूखंड (ॲमिनेटी स्पेस) मिळवून देण्याच्या आमिषाने हडपसर परिसरातील महंमदवाडी येथील एका डॉक्टरांची २४ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी माजी नगरसेविकेसह चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

याप्रकरणी माजी नगरसेविका प्राची आल्हाट, त्यांचे पती अशिष आल्हाट, चिंतामणी कुरणे (रा. महंमदवाडी) आणि आसिफ शेख (रा. मंगळवार पेठ) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत डा ॅ. महेंद्र धोंडीराम सुरवसे (३९, रा. महंमदवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. नोव्हेंबर २०२३ ते जुलै २०२५ या दरम्यान हा प्रकार घडला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी डा ॅक्टरांचे महंमदवाडी परिसरात रुग्णालय आहे. नोव्हेंबर २०२३ ते जुलै २०२५ या कालावधीत आरोपींनी 'ॲमिनेटी स्पेस' मिळवून देणे, तसेच महानगरपालिकेची परवानगी मिळवू देतो, असे सांगितले होते. डा ॅक्टरांकडे २५ लाख रुपयांची मागणी करण्यात आली.

आरोपींवर विश्वास ठेवून फिर्यादी डॉक्टरांनी आपल्या पत्नीच्या आणि मित्राच्या बँक खात्यातून टप्प्याटप्प्याने २४ लाख २० हजार रुपये त्यांच्या खात्यात जमा केले. मात्र, ठरलेली जागा न मिळवून न देता फसवणूक केली, असे डा ॅ. सुरवसे यांनी फिर्यादीत म्हटले आहे.

# पीसीईटी आणि टाटा मोटर्स यांच्या मध्ये सामंजस्य करार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - केंद्र सरकारने २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र करण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. त्यासाठी शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक समूहांनी एकत्र येऊन प्रयत्न करण्याची गरज आहे.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी), पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) आणि टाटा मोटर्स लि. (टीएमएल), टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेइकल लि. (टीएमपीव्हीएल) यांच्या मधील सामंजस्य करारामुळे पीसीईटी शैक्षणिक समुहातील संस्थांमधील विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी क्षेत्रातील कौशल्य विकासास चालना मिळेल, असे प्रतिपादन पीसीसीईटीचे विश्वस्त तथा पीसीयूचे कुलगुरू हर्षवर्धन पाटील यांनी केले. पीसीईटी आणि टीएमएल तसेच टीएमपीव्हीएल यांच्या मध्ये सामंजस्य करार करण्यात आला. पीसीईटीच्या वतीने हर्षवर्धन पाटील, डॉ. गिरीश देसाई तर टीएमएल आणि टीएमपीव्हीएल यांच्या वतीने नीरज अगरवाल, अनुराग छारिया, आदिती गुप्ता, विवेक बिंद्रा यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी पीसीईटीच्या उपाध्यक्षा पद्माताई भोसले, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीईटी प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. शीतलकुमार रवंदळे, टाटा मोटर्सचे कमर्शियल व्हेईकल बिझनेस युनिट प्लांट हेड अनुराग छारिया, टीएमपीव्हीएल प्लांट हेड नीरज अग्रवाल, कॉर्पोरेट फंक्शन्सचे लर्निंग अँड डेव्हलपमेंट हेड मार्सेल फर्नांडिस, टीएमएलच्या एचआर प्रमुख अदिती गुप्ता, मानव संसाधन महाव्यवस्थापक विवेक बिंद्रा, अर्ली करिअर्स अँड कॅम्पस प्रोग्राम कॉर्पोरेट फंक्शन्स प्रमुख राजीव रंजन, कौशल्य विकास प्रमुख सुशील वारंग, कौशल्य विकास प्रमुख शशिकांत रोडे, कर्मचारी संबंध प्रमुख संतोष बडे आदी उपस्थित होते. टीएमएल आणि टीएमपीव्हीएल यांना कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. या सामंजस्य करारामुळे टीएमएल आणि टीएमपीव्हीएलच्या पात्र प्रशिक्षणार्थी उमेदवार, प्रशिक्षणार्थीसाठी मेकॅट्रॉनिक्स अभियांत्रिकीमधील डिप्लोमा प्रोग्रामची रचना, वितरण आणि व्यवस्थापन सहकार्य करण्यात येईल, ज्यामध्ये व्यावहारिक ज्ञान, औद्योगिक प्रशिक्षण आणि रोजगारक्षमता यावर लक्ष केंद्रित केले जाईल. हा सामंजस्य करार कौशल्य विकास आणि दर्जेदार शिक्षणाच्या क्षेत्रात पीसीईटी, टीएमएल आणि टीएमपीव्हीएल यांच्यातील दीर्घकालीन सहकार्य होईल असे अनुराग छारिया म्हणाले. डॉ. गिरीश देसाई म्हणाले की, मेकॅट्रॉनिक्स अभियांत्रिकीमधील हा डिप्लोमा कार्यक्रम बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी (कोणत्याही प्रवाहात) तीन वर्षांसाठी आणि आयटीआय विद्यार्थ्यांसाठी दोन वर्षांसाठी आहे. हा क्रेडिट आधारित सेमिस्टर नुसार कार्यक्रम आहे. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाची सर्व वैशिष्ट्ये यामध्ये आहेत. मूल्यवर्धित अभ्यासक्रम, क्षमता वर्धित अभ्यासक्रम आणि बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम. प्रत्येक विद्यार्थ्याला ईआरपी आणि एलएमएस प्रदान केले जातील. आवश्यक शैक्षणिक क्रेडिट्स यशस्वीरित्या मिळवल्यानंतर, पिंपरी चिंचवड विद्यापीठाकडून डिप्लोमा प्रदान केला जाईल. हे क्रेडिट्स त्यांच्या राष्ट्रीय शैक्षणिक बँक ऑफ क्रेडिट्स (एबीसी) मध्ये जमा केले जातील. या कार्यक्रमातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना विविध उद्योगांसाठी कुशल कामगारांच्या स्वरूपात एक चांगला स्रोत निर्माण होईल. विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी देखील निवड करू शकतात. डिसेंबरमध्ये या शैक्षणिक सत्रास प्रारंभ होईल असे डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले. क्रमिक अभ्यासक्रमाबरोबरच प्रात्यक्षिकांवर आधारित शिक्षण देण्याचा प्रयत्न या माध्यमातून होणार असून विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित होण्यास मदत होईल. पर्यायाने औद्योगिक आस्थापनांना कुशल मनुष्यबळ मिळू शकेल.

त्यामुळे विकसित भारताचा पाया अधिक भक्कम होईल असे नीरज अगरवाल म्हणाले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वागत आणि प्रास्ताविक डॉ. उमेश पोतदार तर किशोर मालोकर यांनी आभार मानले.

# महापालिकेची प्रारूप मतदार यादी 14 नोव्हेंबरला होणार प्रसिद्ध

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी - राज्य निवडणूक आयोगाने आगामी महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादीचा सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांच्या स्वाक्षरीने याबाबतचे आदेश जारी करण्यात आले आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महापालिकेसह राज्यातील २९ महापालिकांची प्रारूप मतदार यादी १४ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाने जारी केलेल्या आदेशानुसार, प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याची अंतिम दिनांक २२ नोव्हेंबर २०२५ असणार आहे. प्राप्त हरकती व सूचनांवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करून ६ डिसेंबर २०२५ प्रसिद्ध करण्यात येईल.

तर मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी ८ डिसेंबर २०२५ प्रसिद्ध करण्यात येणार असून मतदान केंद्रनिहाय मतदार यादी १२ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

# लवकरच....!

## मेट्रो सिटी
## आयकॉन अवॉर्ड २०२५

METRO CITY ICON
AWARD 2025

### दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत वर्धापन दिन निमित्त

## पुरस्कार सोहळा २०२५

वर्ष तिसरे मे

सामाजिक,शैक्षणिक,राजकीय,वैद्यकीय, व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मेट्रोसिटी आयकॉन अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात येत आहे.

– आयोजक –

## शबनम न्यूज मिडिया ग्रुप

शबनम न्यूज | दैनिक मेट्रोसिटी वृत्तांत | सिटीझन मीडिया | सनशाईन ग्राफिक्स

अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734